## अनुसूची-ग

### व्यावसायिक पदव्युत्तर पदवी पाठ्यक्रम

| | | |
|---|---|---|
| १ | पदव्युत्तर पदवीव्यवस्थापन शास्त्र पाठ्यक्रम<br>(एम.बी.ए./ एम.एम.एस) | (१) महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेला उमेदवार,—<br>(एक) उमेदवार भारतीय नागरिक असला पाहिजे ;<br>(दोन) त्याने विद्यापीठ अनुदान आयोगाने किंवा भारतीय विद्यापीठ संघाने मान्यता दिलेल्या कोणत्याही विद्यापीठाकडून देण्यात येणारी कोणत्याही विद्याशाखेतील किमान तीन वर्ष कालावधीची स्नातक पदवी परीक्षा किंवा त्यास समतुल्य परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि त्यात त्याने एकूण किमान ५० टक्के किंवा समतुल्य गुण (महाराष्ट्र राज्यातील आहेत अशाच केवळ मागासवर्ग प्रवर्गांच्या आणि विकलांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत किमान ४५ टक्के गुण) मिळवलेले असावेत ;<br>(तीन) सक्षम प्राधिकरणाने घेतलेल्या सीईटीमध्ये नॉन झिरो प्राप्तांक मिळवलेला असला पाहिजे.<br>(२) अखिल भारतीय उमेदवारी असलेला उमेदवार,जम्मू काश्मीर मधून विस्थापित उमेदवारी असलेला उमेदवार,—<br>(एक) उमेदवार भारतीय नागरिक असला पाहिजे ;<br>(दोन) त्याने विद्यापीठ अनुदान आयोगाने किंवा भारतीय विद्यापीठ संघाने मान्यता दिलेल्या विद्यापीठाकडून देण्यात येणा-या कोणत्याही विद्याशाखेतील किमान तीन वर्ष कालावधीची स्नातक पदवी परीक्षा किंवा त्यास समतुल्य परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि त्यात त्याने एकूण किमान ५० टक्के किंवा समतुल्य गुण (महाराष्ट्र राज्यातील आहेत अशाच केवळ मागासवर्ग प्रवर्गांच्या आणि विकलांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत किमान ४५ टक्के गुण) मिळवलेले असावेत ;<br>(तीन) पुढील पैकी एका परीक्षेमध्ये नॉन झिरो पॉझिटीव प्राप्तांक मिळवलेला असावा ; सक्षम प्राधिकरणाने घेतलेली सामायिक प्रवेश परीक्षा (CET), भारतीय व्यवस्थापन संस्थेव्दारा आयोजीत सामाईक प्रवेश परीक्षा (CAT), अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेद्वारा आयोजित सामाईक व्यवस्थापन अभियोग्यता चाचणी परीक्षा (CMAT), पदवीधर व्यवस्थापन प्रवेश परिषद (युएसए) व्दारे घेण्यात येणारी पदवीधर व्यवस्थापन अभियोग्यता चाचणी परीक्षा (GMAT), भारतीय व्यवस्थापन असोसिएशन व्दारा आयोजीत व्यवस्थापन अभियोग्यता चाचणी परीक्षा (MAT), भारतीय व्यवस्थापन शाळा असोसिएशन द्वारा आयोजित व्यवस्थापन अभ्यासक्रमासाठीची प्रवेश परीक्षा (ATMA), आणि झेवियर्स व्यवस्थापन शाळा जमशेदपुर यांनी आयोजीत केलेली अभियोग्यता चाचणी परीक्षा (XAT).<br>(३) अनिवासी भारतीय/ भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेल्या व्यक्ती / भारतीय वंशाच्या व्यक्तीची , आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले आणि विदेशी नागरिक,—<br>(एक) त्याने विद्यापीठ अनुदान आयोगाने किंवा भारतीय विद्यापीठ संघाने मान्यता दिलेल्या विद्यापीठाकडून देण्यात येणा-या कोणत्याही विद्या शाखेतील किमान तीन वर्ष कालावधीची स्नातक पदवी परीक्षा किंवा त्यास समतुल्य परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि त्याने एकूण किमान ५० टक्के किंवा समतुल्य गुण |